''शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे बदलते परराष्ट्र धोरण:एक अभ्यास''

प्रस्तावना :-

प्रदीर्घ अशा संघर्षानंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र मिळाले हे पाहण्यासाठी एव्हाना ते प्राप्त करण्यासाठी संपूर्ण भारतीयासोबतच थोर राष्ट्रभक्त आणि अनेक क्रांतीकारकांनी आपल्या प्राणाची आहूती दिली. सबब त्यांच्या आहूतीमूळेच भारताला पारतंत्र्याकडून स्वातंत्र्याकडे मार्गक्रमण करता आले. सारे जग निद्रीत असतांना १५ ऑगस्ट १९४७ ला जेंव्हा भारतास स्वतंत्र प्राप्त झाले तेंव्हा 'नियतीशी केलेला करार' या शिर्षकाचे भारताचे पहिले पंतप्रधान पं.नेहरुनी केलेले भाषण संपूर्ण विश्वामध्ये नावाजले गेले. पं. नेहरुंनी केलेल्या या भाषणात भारतातील बऱ्याचस्या गोष्टींचा उपापोह झालेला होता. किंबहूना देशासमोरील पहिल्या भाषणातील विविध प्रश्नांची चर्चा करतांना पं. नेहरु यांनी 'दारिद्रय, अज्ञान, रोगराई' यांचा विशेषत: उल्लेख केला होता. स्वतंत्र भारताच्य पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर मुलभूत विकासापासून ते औद्योगिक क्रांतीपर्यंत कशी वाटचाल करायची ? तसेच आपल्या सार्वभौमत्वाचे संवर्धन व जतन कसे करायचे ? विविध आंतरराष्ट्रीय पातळीवर जे कळीचे मुद्दे आहेत त्याला भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणातून उत्तरे कशी दयायची ? आद्यी आव्हाने तत्कालीन काळात भारतासमोर होती. याशिवाय तत्कालीन काळातील लोकांसाठी रोजगार निर्माण करणे, शैक्षणिक व वैज्ञानिक प्रगती साध्य करणे, अन्नधान्यांचे उत्पादन वाढविणे, मुलभूत व जड उद्योगांची पायाभरणी करणे, अशा सर्व समस्या प्रारंभी देश उभारणीच्या संबंधात होत्या,या समस्यांवर भारताने सावकाशपणे विचार करुन सर्व प्रश्न हातळण्याचा प्रारंभिक कालखंडात प्रयत्न केला.

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगाने विचार करता तत्कालीन काळात असलेल्या 'आंतरराष्ट्रीय जागतिक परिस्थितीकडे' आपणास कानाडोळा करता येत नाही किंवा जी परिस्थिती आहे, तीलाही नजरेआड करता येत नाही. कारण नवस्वतंत्र भारतासमोर अनेक प्रकारच्या समस्या होत्या.किंबहूना या पेक्षा भिषण परिस्थिती आंतरराष्ट्रीय राजकारणाची झालेली दिसून येते. विशेषत: १९४५ मध्ये ६ व ९ ऑगस्ट रोजी अमेरिकेने अनुक्रमे जपानच्या हिरोशिमा व नागासकी या दोन प्रमुज शहारावर अणुबॉम्बचा मारा करुन युध्दातील भिषणता काय असते, हे संपूर्ण जगाला दाखवून दिले होते.त्यामुळे अचानक दुसरे महायुध्द संपले.याच दरम्यान म्हणजे २४ ऑक्टोबर १९४५ रोजी जागतिक स्तरावर शांतात नांदावी या उदात्त हेतूने संयुक्त राष्ट्रसंघटनेचा जन्म झाला.भारत या संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. जागतिक शांततेच्या कार्यात युनोने अनेक कार्यक्रम हाती घेतले असले तरीही १९४५ मध्ये संपलेल्या दुसऱ्या महायुध्दाने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरुपामध्ये अमुलाग्र बदल झाले. द्वितीय महायुध्दोत्तर काळातील आंतरराष्ट्रीय राजकारणाचे एक खास वैशिष्ट्य असे सांगता येईल की, या कालखंडात आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अमेरिकेचा लोकशाही (भांडवलशाही) तर सोव्हिएट रशियाचा (साम्यवादी) अशा वैचारिक मतभेदावरुन दोन महासत्ता उदयास आल्या. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील जगाचे राजकारण या दोन महासत्ता भोवती फिरु लागले.अमेरिका व सोव्हिएट रशिया या दोन्ही महासत्ता प्रतिस्पर्धी या नात्यानेही परस्परासमोर उभा राहिल्या. त्यातून आंतरराष्ट्रीय राजकारणात शीतयुध्दाचा प्रारंभ झाला.एकंदरीत विचार करता दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्याप्तीत फार मोठी वाढ झाली.परिणामी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सगळेच संदर्भ बदलून गेले.

परराष्ट्र धोरण म्हणजे काय :- संशोधनाचे शिर्षक "शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे बदलते परराष्ट्र धोरण : एक अभ्यास" असे असले तरीही परराष्ट्र धोरण म्हणजे काय ? यांचाही उहापोह आवश्यक ठरतो.

याकरिता भारताच्या परराष्ट्र धोरणाची रुपरेखा, उद्दिष्ट्ये, घटक आदी बाबीचे विवेचन (१९४५ ते १९९०) पर्यंतच्या ठळक घडामोडीवर प्रकाश टाकावा लागतोच. शीतयुध्दोत्तर काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात मात्र बदल झालेले दिसून येतात, त्याची कारणेही वेगळी आहेत. जागतिकीज रणाची पार्श्वभूमी, भारताच्या प्रादेशिक सुरक्षाविषयक समस्या, चीन-पाक यांची जवळीकता, १९९० मध्ये रशियाचे झालेले विघटन, सी.टी.बी.टी. बाबत बड्यांचे भारतावरील दबावाचे राजकारण, अमेरिकेचे बदलते द. आशियाची धोरण, युनोच्या सुरक्षा परिषदेमधील ज ायम सदस्यत्व प्राप्तीचा प्रश्न, भारत-अमेरिका अणुकरार, द. आशियाचे भारताकडून नेतृत्तव करणे, महासत्तेकडे भातरताची घौडदौड तसेच शिक्षण,आरोग्य, रोजगार इत्यादी बाबतच्या समस्या, आर्थिक विकास इत्यादीप्रमुख मुद्या-ना भारताने शीतयुध्दोत्तर काळात अग्रीमपणे स्थान दिले आहे. सबबच्या सर्व बाबी केंद्रीभूत ठेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये 'लोकशाही समाजवाद' 'समिश्र अर्थव्यवस्था,' 'विकासाच्या समस्या असलेले तीसरे जग' 'आदर्शवाद ते वास्तववाद' असे विविध स्थिंतत्यरे आपल्या परराष्ट्र धोरणाच्या प्रवाहात दिसून येतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात परराष्ट्र धोरणाला मोठे महत्व असते.ज ोणत्याही स्वतंत्र देश आपले परराष्ट्र धोरण आखून त्याची अमलबजावणी करते.वेगवेगळ्या देशाच्या परराष्ट्र धोरणातून आंतरराष्ट्रीय राजकारण घडत असते.परराष्ट्र धोरण ठरविताना पहिल्या क्रमांकावर 'सुरक्षेचा विचार तर दुसऱ्या क्रमांकावर आर्थिक हितसंबधाचा विचार' महत्वाचा असतो.शीतयुध्दोत्तर काळात 'आर्थिक हितसंबंध व भौगोलिक सुरक्षा' हे दो-हीही बाबी समान महत्वाचे असतात.असे मानले जाऊ लागले आहे.थोडक्यात बाहेरील जगासी आपले संबंध कसे असावेत या बाबत एखाद्या राष्ट्राने घेतलेले निर्णय म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

ज ोणत्याही राष्ट्राचे धोरज हे स्थिर (Static) नसते, तर प्रवाही (Dynamic) असते.अनेक घटकांमुळे त्यात बदल घडत असतात.किंबहूना त्या त्या देशातील राजकीय, आर्थिक परिस्थिती बदलली की, परराष्ट्र धोरण बदलत असते.शक्यतो परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हितसंबधा विषयीचे (Core National Interest) निर्णय महत्वाचे असतात.यामध्ये राजकीय नेतृत्व, नौकरशाही, राजकीय सामरिज भूगोल, राजकीय व्यवस्था, अर्थकारण, लोकमत आदी घटकही त्यावर प्रभाव पाडीतअसतात. अशा सर्व बार्बीचा विचार करुन एखाद्या राष्ट्राने इतर राष्ट्रांशी संबंध प्रस्थापीत करण्यासाठी निश्चित केलेल्या अशा तत्वांना व धोरणांना त्या 'राष्ट्राचे परराष्ट्र धोरण' असे म्हणतात, तरी पण या बाबतच्या किमान दोन व्याख्या तपासणे अत्यंत महत्वाचे आहे.

१) श्लेचर :- "व्यापक अर्थाने परराष्ट्र धोरणात राज्याने बाह्य संबंधाच्या संदर्भात स्वीकारलेली उद्दिष्ट्ये, धोरणे आणि केलेल्या कृती यांचा अंतर्भाव होतो."

२) -ार्म-ा हिल :- "इतर राष्ट्रांच्या संबंधात आपल्या हितसंबंधाची वृध्दी करण्यासाठी चालवलेल्या प्रयत्नांचे सार म्हणजे परराष्ट्र धोरण होय."

वरील व्याख्येच्या विवेचनातून परराष्ट्र धोरणाचा अर्थ अधिकपणे स्पष्ट होतो.एकंदरीत विचार करता आपला भारत हा देखील आंतरराष्ट्रीय समुदयाचा एक घटक आहे.आपल्या देशालाही आंतरराष्ट्रीय समुदायातील इतर राष्ट्रांशी वेगवेगळ्या प्रकारचे संबंध प्रस्थापीत करावे लागतात.परराष्ट्र संबंध ही प्रत्येक देशाची गरज बनली असून त्याला आपला भारत देशही अपवाद नाही.

-ावस्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाची पार्श्वभूमी :- जागतिक राजकारणाच्या बदलत्या संदर्भात नवस्वतंत्र झालेल्या भारताच्या परराष्ट्र धोरणाची मात्र कसोटी ठरली. एकीकडे अण्ववस्त्रधारी अमेरिका आणि रशिया यांचे गटबाजीचे राजकारण तर दुसरीकडे आपल्या नवस्वतंत्र देशासमोरील विविध विकासाच्या समस्या, अशा द्विधा म-ा

स्थितीत भारताने कशा प्रकारचे परराष्ट्र धोरण स्वीकारावे? हा प्रश्न नक्कीच तत्कालीन काळात भेडसावला असेलच असे गृहीत धरायला नक्कीच वाव आहे. वसाहतवाद, साम्राज्यवाद यांचे चटके जवळून सोसलेल्या भारताला गटबाजीचे राजकारण नक्कीच परवडणारे नव्हते, म्हणून या सर्व बार्बीचा भारताने सखोल विचार करुन आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण सुध्दा स्वतंत्र असेल या करिता कांही महत्वाची पाऊले उचलली. परंतु पारतंत्र्यात असतानाच स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण कसे असावे? याचाही विचार पं. नेहरुनी केला होता असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. कारण स्वतंत्रपूर्व काळात अनेक अशा घडामोडी घडल्या होत्या की, ज्यामूळे स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण आणि भारताची आंतरराष्ट्रीय क्षेत्रात काय प्रतिमा असावी यांचा विचार विनिमय सुध्दा झालेला दिसून येतो. विशेषत: १८८५ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेस सारख्या भारताच्या हिताबद्दल वेळोवेळी सूचित केले होते. या शिवाय आयरिश स्वातंत्र्याचा लढा, १९१७ ची रशियन राज्यक्रांती, चीन विरोधी लढाईसाठी भारतीय सैन्याचा वापर करु नये आदी बाबतीत कॉंग्रेसने मद्रास, कलकत्ता, हरीपुरा अधिवेशनात भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगाने कांही महत्वाचे ठराव पास केले होते. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पं.नेहरुना अनेक विदवान मान्यता देतात.'अलिप्ततावाद' हा पं.नेहरुंच्या परराष्ट्र धोरणातील महत्वाचा आधार होता.१९२७ मध्ये पं.नेहरु यांनी जेंव्हा सोव्हिएट रशियाला भेट दिली तेंव्हा त्यांच्या लक्षात आले की, युरोपात प्रचंड प्रमाणात उलथापालथ चालू आहे.तेंव्हा ब्रिटिशांकडून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताला फक्त आपल्या देशाकडेच नव्हे तर एकूण जगाकडे लक्ष दयावे लाजजार होते.असा विचार त्यांनी केला. सांगण्याचा तात्पर्य हा आहे की, भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या सुमारे २० वर्षे अगोदर अपल्या सार्वभौम देशाचे परराष्ट्र धोरण कसे असेल?याचा विचार सुरु केला होता.सर्वसाधारपणे भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगाने विचार केलो तर १९२७ ते १९३५ या काळात भारत-पाक यांच्या फाळणीचा विचार नव्हता.चीन मधील क्रांतीही तशी दुर होती. दुसरे महायुध्द सुध्दा सुरु झाले नव्हते त्यामुळे चीन-पाकिस्तान किंवा गटबाजीचे राजकारण डोळ्यासमोर ठेऊन भारताचे परराष्ट्र धोरण आखण्याचा मुद्याही नव्हता, तरीपण जग कसे असावे आणि त्यासाठी भारताने काय प्रयत्न करायलला हवेत याची रुपरेखा मात्र होती, पंडीत नेहरुंच्या डोळ्यासमोर होती ती रुपरेखाच पुढे (नाम) निर्मितीचा आराखडा तयार करताना मार्गदर्शक ठरली. पं.नेहरुंनी अलिप्ततावादाबाबत असे मत व्यक्त की, अलिप्ततावाद हा भारताचा पुर्वोइतिहास, आपले जीवन विषयक दृष्टिकोण, भारताचे भूराजकीय स्थान, आकारमान, आर्थिक विकासाची निकड, हिंदु-बौध्द दर्शनामधील संहिष्णूता, सत्य, न्याय आदी दृष्टिकोणातून अलिप्ततावाद (सकारात्मक) अत्यंत महत्वाचा आहे. म्हणून १९२१ पासून ते १९४६ पर्यंत सातत्याने अलिप्ततावादाच्या तत्वाला अनुरुप अशी भूमिका घेणारे पं.नेहरु हे एकमेव काँग्रेस नेते होते.त्यावर टीका झाली तरीही ते थकले नाहीत.एका बाजूने पाश्चिमात्य उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेचे जसे आकर्षन होते.तसेच रशियाने साधलेल्या प्रगतीचेही होते.परंतु आपला देश कोणत्याही एका विचारसरणीशी कायमचा बांधला जाऊ नये, म्हणून समिश्र अर्थव्यवस्था आणि लोकशाही समाजवादाची धारणापुढे केली. आपण कोणाचेही अंकित बनणार नाही याची काळजी घेतली.

शीतयुध्द, आणि गटबाजीचे जागतिक राजकारण विकसनशील असणाऱ्या भारतासाठी परवडणारे नव्हते. म्हणून भारताचे सुरुवातींच्या कालखंडातील आपले परराष्ट्र धोरण स्वतंत्र ठेऊन त्यात अलिप्ततावादाचे समर्थन, (सकारात्मक) वसाहतवाद-साम्राज्यवादास विरोध, पंशील धोरणाचा स्वीकार, गटबाजी, वर्णद्वेष, वंशवादास विरोध, शांततामय सहजिवनाचा पुरस्कार, शस्त्र-अस्त्र स्पर्धेस विरोध आदी आदर्शवादी तत्वामधून भारताने आपल्या परराष्ट्र धोरजांची मर्हूतमेढ रोवतांना 'आफ्रो-आशियायी' राष्ट्रांच्या एकातमतेला प्राधान्य दिले.तसेच गटबाजीचा राजकीय सिध्दांत नाकारुन दोघांकडूनही मदत घेण्याचा प्रयत्न केला.प्रादेशिक राजकारणाचे कांही महत्वपूर्ण प्रश्न दरम्यानच्या काळात भारताने हताळण्याचा प्रयत्न केला.१९४८ मध्येच काश्मीर प्रश्न युनोत नेला.१९५४ मध्ये चीन सोबत

वाटाघाटी केल्या. अमेरिका-रशिया या दोन्ही राष्ट्रांज डून त्याच्या प्रगत तंत्रज्ञानाची भारताला कांही प्रमाणात मदत होते का ?याचीही चाचपणी केली.याच दरम्यानच्या काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर 'सेंन्टो, सिएटो, वार्सा, ज ॅमि-फार्म' आदी लष्करी संघटना निर्माण झाल्या होत्या, पण अशा एकाही संघटनेचे सदस्यत्व भारताने स्वीकारले नाही.मात्र १९५५ मध्ये पाकिस्तान अमेरिकेच्या लष्करी संघटनेचा सदस्य झाला.पुढे थोड्याच दिवसात १९६२ मध्ये साम्यवादी चीनने भारतावर आक्रमण केले.१९६५ च्या भारत आणि पाकिस्तान युध्दात चीनने पाकची बाजू घेतली.आंतरराष्ट्रीय राजकारणात 'चीन-अमेरिज ा पाकिस्तान' यांनी भारताची कोंडी करण्याच्या प्रयत्नात होते. विशेषतः १९६२ च्या भारत-चीन युध्दानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात कमालीचे बदल झाले. कारण येथूनच भारताने आदर्शवादी परराष्ट्र धोरणाऐवजी वास्तववादी परराष्ट्र धोरण स्वीज ारले.१९६२ च्या नंतर भारताने अणुविकासाचा कार्यक्रम हाती घेतला.सैन्याची योग्य जमवा जमव केली.परिणामी १९६५ च्या युध्दात भारताला विजय प्राप्त झाला. लगेच श्रीमती इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली १९७४ मध्ये भारताने पहिला अणुस्फोट केला. या अणुस्फोटानंतर अमेरिकेने भारताच्या तंत्रवैज्ञानिक बाबतीत दमदाटी करण्याचा प्रयत्न केला. एव्हाना एन.पी.टी. तथा सी.टी.बी.टी. या दोन्ही ज राराच्या अनुषंगाने भारतावर दबावाचे राजकारण सुरु झाले.परिणामी रशियाने भारताला संकटसमयी अनेक वेळा मदत केल्यामुळे भारत रशियाज डे झुकला.एकंदरीत 'राष्ट्रीय हित' हे कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाचा आत्मा असतो.तो शाबूत ठेवण्यासाठी वेळप्रसंगी राष्ट्राच्या धोरणात बदल करावा लागतो.भारताने अशा सर्व आंतरराष्ट्रीय समस्येचा विचार करुन १९९० पर्यंत म्हणजे शीतयुध्दाच्या समाप्तीपर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणात फारसे बदल झाल्याचे जाणवत नाही. त्यात १९४७ ते १९६२ पर्यंत भारताचे परराष्ट्र धोरण पुर्णतःहा आदर्शवादी राहिले तर १९६२ नंतर हेच परराष्ट्र धोरण वास्तववादाकडे झुज ले. हा ज ाळ साधारणपणे १९६२ ते १९९०पर्यंतचा होय. याकाळात 'अमेरिका-पाज -चीन' या लॉबिला सावधपणे प्रत्युततर देणे, एन.पी.टी. करारावर स्वाक्षरी न करणे, रशियाची मैत्री कायम राखून देशातील विविध -ाजरी समस्या सोडविणे हे आपल्या परराष्ट्र धोरणाचे महत्वपूर्ण प्रवाह राहिले आहेत. तरीही दरम्यानच्या काळात काश्मीरमधील हिंसाचार वअन्य राज्यातील दहशतवाद यांचा बिमोड करुन जागतिकीज रणाच्या प्रवाहात भारताला सामिल व्हावे लागेल, असा वैचारिकसूर संबंधीत कालावधीतील आपल्या परराष्ट्र धोरणात दिसून येतो.

शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे परारष्ट्र धोरण :-१९९० मध्ये सोव्हिएट रशियाचे विघटन झाले.तेंव्हापासून जगात एकमेव महासत्ता (सर्वोच्च श्क्तीमान) राष्ट्र म्हणून अमेरिकेचा उल्लेख होऊ लागला.शीतयुध्दाची अखेर हा जागतिक राजकारणातील एक महत्वपूर्ण बदलाचा टप्पा शीतयुध्दाच्या समाप्तीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील संरचनामध्ये बदल झाले. दरम्यानच्या काळात शीतयुध्दोत्तर भारताच्या परराष्ट्र धोरणासमोर जागतिकीकरण, सी.टी.बी.टी. करार, भारताचे आर्थिक प्रश्न, रशियाचा झालेला पाडाव, चीन-पाकिस्तान यांनी भारतासमोर निर्माण ज ेलेले प्रादेशिज सुरजा विषयज प्रश्-ा,चीन-पाकिस्तानची अणुशास्त्रात वाढलेली मैत्री व भारताला दिलेली धमकी, याला प्रत्युत्तर म्हणून भारताने १९९८ मधील ज ेलेले पाच अणुस्फोट, सी.टी.बी.टी. बाबत अमेरिकेचा दबाव, कमकुवत झालेला सोव्हिएट रशिया आदी प्रश्न भारताच्या परराष्ट्र धोरणासमोर होते.अशा सर्व प्रश्-ात भारताने समयसूचकता ओळखून आपल्या परराष्ट्र धोरणाला नवे आयाम प्राप्त करुन दिले.आपल्या मुत्सदेजिरीतून अण्वस्त्र क्षमता प्राप्त करण्याची भारताची अपरिहार्यता अमेरिकेला पटवून देण्यात आखेर भारताला यश आले.१९९९ साली 'जसवंत-टॅलबॉट' चर्चेतून भारताने हे उद्दिष्ट्ये साधले.

शीतयुध्दोत्तर काळातील प्राधान्यक्रमाने अमेरिकेचे दक्षिण आशिया विषयक धोरण बदलेले. या बदलामाजे महत्वाचे कारण म्हणजे अमेरिकेवर झालेला ११/१ चा दहशतवादी हल्ला होय. तसेच चीनच्या वाढत्या शक्तीचा

विचार करुन जिंबहूना दहशतवाद विरोधी लढ्यात भारताचे सहकार्य आवश्यक आहे म्हणून भारताला जवळचा मित्र बनवले.परिजामी या दोन्ही २००६ मध्ये अणुकरार केला.भारत 'विभाजीय सत्ता' म्हणून पुढे यावी, असा शीतयुध्दोत्तर काळातील अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचा एक महत्वपूर्ण विचार झाला.भारताचे बाह्यगत परराष्ट्र धोरण महत्वाचे वाटत असले तरीही अंतर्गत प्रश्नाकडे आपणाला दुर्लक्ष करता येणार नाही.देशांतर्गत सामाजिक सलोखा, आर्थिक विकास, राजकीय स्थैर्य, राष्ट्रवादाची जोपासना या सर्व अग्रीम बाबी शीतयुध्दोतर काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात दिसून येतात. विशेषतः जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारत इतिहासाच्या वेगळ्या प्रश्नावर येऊन ठेपला आहे. जागतिकीकरणाच्या नवीन प्रवाहात दक्षिण आशियाचा खऱ्या अर्थाने विकास होणे आवश्यक आहे. १ जानेवारी १९९५ रोजी भारत सरकारनेही 'डंकेल प्रस्ताव' स्वीकारला असला तरीही आजच्या जागतिकीजरणाच्या प्रक्रियेत द. आशियातील राष्ट्रांना विविध समस्यांनातोंड दयावे लागत आहे.त्यात आरोग्य, शिक्षण, शस्त्रांचा व्यापार, दहशतवाद, वाढती लोकसंख्या असे विविध प्रश्न भेडसावत आहेत.त्या दुर करण्यासाठी कांही उपाययोजना कराव्यात याबाबत भारताचे परराष्ट्र धोरण महत्वाचे आहे.विश्व बँक, आंतरराष्ट्रीय नाजेनिधी यांच्या विविध अहवालात आर्थिक विकासाच्या आधारावर स.न. २०२५ पर्यंत भारत एक महासत्ता म्हणून उदयास येईल असे म्हंटले आहे.तर 'इंडिया २०२०: ए व्हिजन फार न्यू मिलेनियम' या पुस्तकात डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी भारतातील विज्ञान, तंत्रज्ञान कृषी, आरोग्य, संरक्षण २०२० पर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेत हाअंदाज व्यक्त केला आहे.भारत महासत्ता बनावा याबाबत आपल्या नेत्यांच्या अकांक्षा लपुन राहिल्या नाहीत, हे विशेष आहे.

शीतयुध्दोत्तर काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणाचे ठळक मुद्दे म्हणजे आदर्शवादापेक्षा वास्तवादाला महत्व देणे, युनोच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व मिळविणे, जागतिक राजकारणा पेजा जेत्रिय राजकारणाला महत्व, अण्वस्त्र संपन्नते सोबत द. आशियाचे नेतृत्व करणे, अलिप्ततेचा नवा चेहरा जगासमोर आणणे, दशहतवादाविरोधी मोर्चेबांधणी करणे. अमेरिकेशी जवळीकता, मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार या प्रमुख बाबी शीतयुध्दोत्तर परराष्ट्र धोरणात मध्यभागी आहेत.तसेच भारताच्या पंतप्रधानपदी श्री नरेंद्र मोदी यांच्या निवडीपासून भारताच्या परराष्ट्र धोरणात कमालीचे बदल जाणवत आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या कार्यकाळातील सर्वाधिक लक्षणीय, उपलब्धी परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात आहे ही कांहीशी सुखद आश्चर्याची बाब आहे. त्याची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीच्या दिवशीच झाली.भारतीय उपखंडातील सर्व राष्ट्रप्रमुखांशी गुप्तगू जरुन पंतप्रधान नरेंद्र मोदीनी त्यांच्या स्वतःच्या 'आंतरराष्ट्रीयकरणाची' धडाडी तुतारी फुंकली. मग त्यांनी भूतान, नेपाळ या देशाना यशस्वी भेटी दिल्या.नंतर त्यांनी ब्रिक्स शिखर परिषदेत भाग घेतला मज जपान, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, उझेबिक्सतान यांच्या राष्ट्रप्रमुखांशी त्यांच्या यशस्वी भेटी झाल्या. त्यानंतर बराकओबामा,चीनचे सर्वेसर्वा जिनपिंग भारताच्या भेटीवर आले.जरे पाहता पंतप्रधान नरेंद्र मोदी सारख्या भारतीय राष्ट्रप्रमुखांची ही घौडदौंड उल्लेखनीय आहे.याबाबत कोणाचेही दुमत होण्याचे कारण नाही. तात्पर्य हा आहे की, भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुलभूत रुपरेखा आणि चौकट आजही जायम असून जागतिकीकरणाच्या अनुषंगाने काळसापेक्षतः भारताच्या परराष्ट्र धोरणात वास्तववादी नवीन प्रवाह रुढ झालेले दिसत आहेत. या करिता भारताच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास करतांना स्वातंत्र्याच्या काळापासून 'विश्वासार्ह व्यवहार' जेलेला आहे.किंबहूना भारतासमोर कांही विकासाचे प्रश्न असून प्रादेशिक सुरक्षा विषयक कांही तणावजन्य प्रश्नामुळे आपल्या विकासामोर जांही प्रश्न निर्माज झाले आहेत.म्हणून शीतयुध्दोत्तर काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणात जे नवीन प्रवाह आले आहेत.नक्कीच त्यांची वाटचाल फलद्रुप होज्याकडे चालू आहे. तत्पूर्वी'शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे बदलते परराष्ट्र धोरण : एक अभ्यास' या विषयाच्या अनुषंगाने जांही ठळक प्रकरणे पाडून आदर्शवाद ते वास्तववाद हा आपल्या परराष्ट्र धोरणाचा एक वैचारिक प्रवाह राहिला.अलिकडे भारताला एक मोठी बाजारपेठ किंवा गिऱ्हाईक

म्हजू-न पहात होते, ते आता जमणार नाही.कारण भारताचे परराष्ट्र धोरण आपल्या नागरी समस्या, आर्थिक विकास, औद्योगिकरण, महासत्ता म्हणून पुढे येणेया सर्वबाबी आता आपल्या परराष्ट्रधोरणातून पुढे आल्या आहेत.अशा सर्व बाबी निष्ज् र्षामध्ये मांडण्यात येणार आहेत.संशोधज् ाने संबंधीत संशोधन कार्यासाठी पुढील प्रकारचा संशोध-न आराखडा तयार केला असून तो आराखडा पुढील प्रमाणे आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-प्रस्तुत संशोधनात विषयाच्या अनुषंगाने कांही उद्दिष्ट्ये निश्‍चित करण्यात आलेले आहेत.

१. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणाबाबतची वैचारिक धारणा स्पष्ट करणे.
२. भारताचे आदर्शवादी परराष्ट्र धोरण ते वास्तववादी परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगाने जी जडणघडण झाली तीचा अभ्यास करणे.
३. भारताच्या परराष्ट्र धोरणातील 'राष्ट्रीय हितसंबंध' ही संकल्पना ज्ेंद्रस्था-नी मा-नून शीतयुध्दोत्तर ज् ाळातील भारताचे परराष्ट्र धोरण स्पष्ट करणे.
४. ११९० नंतर एक्रध्रुविय राजकारण, बदलते जागतिक संदर्भ, आपल्या आर्थिज् व सामरिज् विकासाच्या जरजा, दक्षिण आशियायी राजकारण इत्यादीच्या अनुषंगाने भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणाचे नवे आयाम स्पष्ट करणे.
५. विविध आंतरराष्ट्रीय प्रश्नातील दहशतवाद, प्रादेशिक सुरक्षेसमोरील आव्हाने, शेजारील देशांशी युध्दे, वंशभेद, मानवीहक्क, जागतिकीकरण इत्यादीतील भारताच्या भूमिकेचे स्पष्टीज् रज ज् रजे.
६. भारताच्या परराष्ट्र धोरणातील आदर्शवादी आणि मानवतावादी दृष्टीकोणातून संमग्र उद्दिष्टांचे अध्ययन ज् रजे.

संशोधनाची समस्या :- संशोधज् ाने संशोध-न ज् ार्यासाठी संशोधनाविषयक पुढील समस्या निश्‍चित केली आहे.

१. शीतयुध्दोत्तर भारताच्या परराष्ट्र धोरणापुढील जागतिक व प्रादेशिक स्तरावर निर्माण झालेल्या विविध समस्येचे अध्ययन करणे.
२. स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या आदर्शवादी परराष्ट्र धोरणासमोर निर्माण झालेल्या विविध समस्येचे अध्ययन करणे.

ज़ृहितके :-संशोधकाने संशोधन कार्यासाठी खालील गृहितके निश्‍चित केली आहे.

१. भारताने आपल्या प्रारंभीक परराष्ट्र धोरणात गटबाजी-वसाहतवाद, साम्राज्यवाद नाकारुन पंचशिलावर आधारीत अलिप्ततचे समन्यायी परराष्ट्र धोरण विकसित केले.
२. ज् ोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण हे त्या देशाचा इतिहास, संस्कृती, राजकीय विचारप्रवाह यावर अवलंबून असते, यास भारत ही अपवाद नाही.
३. शीतयुध्दोत्तर काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात कमालीचे बदल झाले असून रोजगार निर्मिती, आर्थिक विज् ास, दहशतवादाचा बिमोड आदी मुद्देभारताने ज्ेंद्रस्थानी ठेवले आहेत.
४. द. आशियाचे नेतृत्व करणे, विभागीय शक्ती म्हणून पुढे येणे, अण्वस्त्र संपन्नता प्राप्त ज् रताना बड्यांशी मैत्री राखतांना भारता-नेआपल्या परराष्ट्र धोरणाची मुलभूत चौकट कायम ठेवली आहे.
५. शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे परराष्ट्र धोरण हे अधिक वास्तववादी झाले असून राष्ट्रीय हितसंबधाच्या दृष्टीकोणातून अनेक नवीन मुद्यांचा समावेश भारताच्या परराष्ट्र धोरणात झाला आहे.

६. भारताच्या परराष्ट्र धोरणातील जी प्रमुख उद्दिष्ट्ये होती ती बहूधा फलद्रुप झाली आहे. एव्हाना ती उद्दिष्टे आजही कायम आहे.

संशोधनाची अभ्यास पध्दती :-

प्रस्तुत संशोधनामध्ये "शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे परराष्ट्र धोरणः एक अभ्यास" या विषयावर संशोधनाचे कार्य अभ्यासाच्या दृष्टिकोणातून करीत असतांना भारताच्या परराष्ट्र धोरणाबाबतचे जे कांही साहित्य उपलब्ध आहे. त्यात असे दिसते की, भारताने पारंपारिक भूमिकेपासून ते वास्तववाद सिध्दांत, नवीन वास्तववादाच्या सिध्दांतातील झालेले बदल आणि आदर्शवादाचा सिध्दांत यांचा वापर परराष्ट्र धोरण आखत असतांना वेळोवेळी केलेला आहे. या पलिकडे जाऊन विचार करता भारताच्या परराष्ट्र धोरणात प्रामुज्या-ने लष्ज र, राजनय, प्रशासकीय सेवा, राजकीय नेते, संरक्षण आणि सामाईक विश्लेषक, प्रसारमाध्यमे, परराष्ट्र व्यवहारखाते, परराष्ट्रमंत्री, राजदुत, पंतप्रधान, संसदीय परराष्ट्र सचिव इत्यादीच्या भूमिका अत्यंत महत्वाच्या असतात. किंबहूना शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे परराष्ट्र धोरणाचे जेंव्हा अध्ययन होते, तेंव्हा जागतिकीकरण आणि भारताचे प्रादेशिज प्रमुज देशांशी संबंध, आपल्या परराष्ट्र धोरणाची पार्श्वभूमी इत्यादी बाबींचा मुद्देसुद अभ्यास करुनच निष्कर्षाकडे जावे लागते. याकरिता ग्रंथालयीन अभ्यास पध्दती प्रमाण मानून संशोधनाच्या जरजेप्रमाणे ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक पध्दतीने अभ्यास करुन तुलनात्मक गुजात्मक कांही बाबतीत संख्यात्मक पध्दतीनेही प्रस्तूत संशोधनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

तथ्यसंकलन माहितीचे स्त्रोत :-

तथ्य संकलनाचे दोन प्रमुख प्रकार पडतात.त्यात **प्राथमिज साध-ने आणि द्वितीय साधने** यांचा समावेश होतो. संशोधनाच्या गरजे प्रमाणे संशोधज ाने संशोधन कार्य सुरु करण्याच्या अगोदर तथ्यांचे संकलन केले असून प्रस्तूत संशोधन कार्यात प्रलेखीय स्त्रोतावर अधिक भर दिला आहे. किंबहूना संशोधन कार्यासाठी माहिती गोळा करीत असतांना प्रकाशित साधनावर आधिक भर दिला असून त्यात ग्रंथे, पुस्तके, साप्ताहिके, भारत सरकार व राज्य सरकारकडून प्रकाशित होणारे गॅजेट नियतकालिके, विविध रिपोर्ट, मासिज्े यांचा तथ्य संकलनात समावेश आहे. या शिवाय नकाशे, छायाचित्रे, आकडेवारी इत्यादी साधनांचा वापर करुन संशोधन कार्य अधिक विश्वासज-ज व्हावे यासाठी प्रयत्न केले आहेत.

संशोधनाचे महत्व :-

संशोधनाचे महत्व स्पष्ट करतांना 'भारताचे परराष्ट्र धोरण' हा विषयच मूळात अत्यंत महत्वाचा आहे.विशेषतः शीतयुध्दोत्तर काळात तर त्याच्या व्याप्तीमध्ये खुप मोठा फरक पडला आहे. ज ारण संबंधित विषयाचे संशोधन करताना स्वतंत्रपूर्व ज ाळापासू-न भारताने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अनुषंगाने विविध प्रश्नांना हात घालण्याचा प्रयत्न केला आहे. भारताच्या स्वातंत्र्या बरोबरच जगाचे दोन गटात विभाजन झाले.अशा वेळी भारताने पंचशिल, अलिप्तता वादाचे समर्थ-न ज रु-न वसाहतवाद, साम्राज्यवादाचा विरोध करुन स्वतंत्र परराष्ट्र धोरणविज सीत जे ले.आंतरराष्ट्रीय राजकारणात बड्यांच्या पक्षपाती धोरणाला भारताने कधीही समर्थन दिले नाही. १९६२ च्या भारत-चीन युध्दानंतर भारताचे परराष्ट्र धोरण वास्तवादाकडे झुज ले १९७४ च्या आपल्या अणुस्फोटानंतर चीन, पाक, अमेरिका या लॉबिला भारताने जशास तसे उत्तर दिले.१९९० च्या जागतिक राजकारणाच्या बदलत्या अनुषंगाने भारताचे परराष्ट्र धोरण अधिक वास्तववादी बनले.परिणामी द. आशियायी क्षेत्राच्या विकासासह विविध प्रादेशिज

मुद्यांना भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात हेतुपूर्वक लक्ष दिले. परिणामी जागतिकीकरण १९९८ चे अणुस्फोट भारत-अमेरिका अणुकरार, अलिकडे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी विविध देशांचे परदेश दौरे ज रुन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवे आयाम प्राप्त करुन दिले आहेत. या दौऱ्यामध्ये विविध देशांशी ऊर्जा, संरक्षण, व्यापार, रोजगार आदी बाबतचे ज रार झाले आहेत.यामुळे भारताचे परराष्ट्र धोरणात नवीन प्रवाह येत असले तरीही मुलभूत चौकट आजही मात्र कायम ठेवण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे संबंधीत विषयाचे महत्व जाणवते.

<u>संशोधनाची व्याप्ती :-</u>

मूळातच हा विषय अत्यंत व्यापक आहे.शोध प्रबंधात भारताच्या परराष्ट्र धोरणाबरोबर विविध कालक्रमीत घटनांचे सुध्दा सुक्षम अध्ययन करण्यात येणार आहे. त्यामुळे संशोधन कार्याची व्याप्ती ठरवितांना भारताच्या परराष्ट्र धोरणाची पार्श्वभूमी, स्वतंत्रपुर्व व स्वतंत्र काळातील भारताचे प्रारंभीक परराष्ट्र धोरण, अलिप्ततावाद, पंचशिल, महासंताची धोरजेआदी मुद्यांनाही स्पर्श करावा लागणारा आहे. विशेषता १९६२ च्या भारत-चीन युध्दानंतर भारताच्या मुलभूत परराष्ट्र धोरणात वास्तववादी धोरणाने प्रवेश केला.तसेच शीतयुध्दानंतरचे भारताचे परराष्ट्र धोरणात जागतिकीकरण अणुकरार, दहशतवाद, सुरक्षा परिषद, आर्थिक विकास, अमेरिकेशी जवळीक्ता, दशिक्ष आशियायी देशावर प्रभूत्वाचे राजकारण, ऊर्जा रोजगार, यांचेही तुलनात्मक अध्ययन या ठिकाणी अपेक्षित आहे. म्हणून आहे. याला दोन भागात विभागता येते. १९४७ ते १९९० हा पहिला भाग तर दुसऱ्या भागात १९९० ते चालू अशा कालक्रमीत घटनांचे अध्ययन महत्वाचे ठरते.

<u>संशोधनाची मर्यादा :-</u>

संशोधज ाने संशोधन ज ार्य सुरुवात करण्याच्या अगोदर संशोधन कार्याची दिशा व त्यानुषंगाने संशोधनावर येणाऱ्या मर्यादा निश्चित केल्या आहेत."शीतयुध्दोत्तर भारताचे परराष्ट्र धोरण: एक अभ्यास" असा संशोधनाचा विषय असला तरीही विविध काळामध्ये या परराष्ट्र धोरणात कमालिचे बदल झाले आहेत. मात्र मुलभूत चौकट कायम आहे. म्हणून या अनुषंगाने याशिवाय जागतिक राजकारजातील वाढती गुंतागुंत, महासत्ता देशासोबतचे संबंध, भारताचे शेजारी देश, जागतिकीकरण आणि शीतयुध्दोत्तर भारताचे परराष्ट्र धोरण यानुषंगाने संशोधन ज ार्यामध्ये एकूण ७ प्रकरणे पाडण्यात आली प्रत्येक प्रकरण हे भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगाने निश्चित केली आहेत.

<u>निष्ज र्ष :-</u>

"शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे परराष्ट्र धोरण : एक अभ्यास" या संशोधन शिर्षकाचा दृष्टिकोणातून संपूर्ण संशोधन कार्य केल्यानंतर संबंधीत अध्ययनातून संशोधकास नेमके काय आढळले या बाबतचे सर्व निष्ज र्ष या प्रकरणात मांडण्यात येणार आहेत. किंबहूना भारताच्या सुधारित परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगाने कांही नावीन्य पूर्ण शिफारसी संशोधक या नात्याने कराव्या लागणार आहेत.

निवडक संदर्भग्रंथ सूची

1.	Modern-India	:-	Chandra Bipin
2.	Indian foreign policy	:-	Basv Ravider
3.	Indian Foreign Policy	:-	Fadiya B.L.
4.	Global Political-Economy	:-	Revenhill John
5.	International Politics	:-	Robert Art
6.	India world Affairs	:-	Thakkar Usha
7.	International Politics	:-	S.J.R. Bilgrami
8.	India in the world order	:-	Raj Baldev
9.	The Political Economy	:-	Robert Gilpin
10.	Inter National Relations	:-	Sinhal S.C.
11.	International Relations theory	:-	Sharma Urmila
12.	Globalization and changing Political Culture	:-	Singh Manju

१.	भारताचे परराष्ट्र धोरण	:-	डॉ. देवळाणकर शैलेंद्र
२.	आंतरराष्ट्रीय संबंध	:-	डॉ. देवळाणकर शेलेंद्र
३.	आधुनिक भारत	:-	प्रा. जाबडे दि-ग्ज र
४.	संशोधन पध्दती	:-	डॉ. कायदेपाटील गंगाधर
५.	संशोध-न पध्दती व तंत्रे	:-	डॉ. आगलावे प्रदिप
६.	राष्ट्रीय सुरक्षा	:-	डॉ. गद्रे अरुण
७.	भारताचे परराष्ट्र धोरण	:-	प्रा. पाटील व्ही.बी.
८.	आंतरराष्ट्रीय संबंध	:-	पेडंसे अरुणा
९.	जागतिक राजकरणात भारत	:-	डॉ. खरे विजय
१०.	आंतरराष्ट्रीय संबंध	:-	डॉ. बोराळकर कृ.दी.
११.	पं. -नेहरु	:-	नाईक सदानंद
१२.	भारताचे परराष्ट्र धोरण	:-	डॉ. भोगले शांताराम
१३.	जागतिक राजकारणातील समस्या	:-	डॉ. शिंदे ज.रा.
१४.	अटल बिहारी वाजपेयी	:-	देसाई जयश्री
१५.	इंदिरा गांधी व आणीबाणी :	-	धर पी.एन.
१६.	आंतरराष्ट्रीय राजकारण	:-	पाटील व्ही.बी.
१७.	शोध नव्या भारताचा	:-	माशेलज्ञ र रघुनाथ
१८.	भारताचे परराष्ट्र धोरण	:-	डॉ. दिवाण चंद्रशेखर
१९.	भारताचे परराष्ट्र धोरण	:-	डॉ. साबळे आर.डी.

संशोधन आराखडा निहाय्य प्रकरणाची माहिती

अ. क्र.	संशोधन प्रकरणाचे नाव
०१	प्रस्तावना
०२	संशोध-न साहित्याचा आढावा
०३	स्वातंत्र्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाची दशा आणि दिशा.
०४	जागतिकी करण आणि भारताचे बदलते परराष्ट्र धोरज.
०५	भारताचे प्रमूख राष्ट्रांशी संबंध व आर्थिक घटकाला प्राधा-य.
०६	आदर्शवादाकडून वास्तववादाकडे झालेला प्रवास.
०७	समारोप-निष्कर्ष आणि शिफारसी.

टिप :- उपरोक्त संशोधन आराखड्यात माहिती उपलब्धतेच्या आधारावर अंशिक बदल जे ला जाऊ शकतो.

संशोधक

श्री ह-मंत गणपती पचलिंग

मार्गदर्शक

डॉ. एस.बी. फड
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
नेताजी सुभाषचंद्र महाविद्यालय, नांदेड